# कथा-४

# <-: हारोपलेल्या पोराची कहाणी-:>

अजुक तो मने कोणत्या एका माणसाचे दोन पोरं होते.त्याच्यातून लायन्यांन आपल्या बापाले म्हणलं,बापा[बाबा]मालमत्तेचा जो काई वाटा माह्याला हाय, तो मले दे,तवा त्यानं आपली संपत्ती वाटून देली.अन् थोडंसेक दिवसं झाले होते,की तोचं लायना पोरगा सर्व काई जमा करून,दूरच्या देशांत गेला, अन् तती कुकर्मात मोजमजात आपली धन संपत्तीगमाऊन ठाकली.अन् त्यानं सरं खर्चन ठाकल्यावर तवा देशांत मोठा दुष्काळ पडला,तवा तो पूर्ण कंगाल झाला होता.तवा त्यानं तथल्यां एका रायणाऱ्यांजवळ जाऊन त्याचा आश्रय घरला,त्या माणसानं त त्यालें वावरात डुकरं चाऱ्यालें पाठवलं.
अन् त्यालें असं वाटे डुकरं जे टरफले खात असत,त्यानं तरी आपलं पोटं भरावं,पण तेहि त्यालें भेटत नोतं.मंग तो शुद्धीवर येऊन म्हणला,माह्यावाल्या बापाच्या घरी कईक मजूरांय्लें जेवण भेटते तेहि ऊर-पुर भेटते,पण म्या अति भूकीनं मरून रायलो हाय.
म्या उठून आपल्या बापाच्यापासी जाईन अन् म्हणीन.बापा [बाबा] म्या स्वर्गाच्या अन् तुह्या विरोधात पाप केलं हाय.म्हणून म्या ह्या योग्य पण नाई कि तुह्यावाल्या पोरगा व्हावं म्हणून,मले आता एक मजूरां सारख ठेव.तवा तो उठला अन् आपल्या बापाच्या पासी वापस आला,अन् जवा तो दूरचं होता,तवा त्याच्या बापानं त्यालें पाऊन कळवळा ठाकला,अन् पयत जाऊन त्याच्या गयात मिठी मारली अन् मुकें घेऊ लागला.
तवा पोरांन बापाले म्हणलं,बापा[बाबा] म्या स्वर्गाच्या विरोधात तुह्यावाल्या नजरीत पाप केलं हाय,आता म्या तुह्या पोरगा व्हावं म्हणून ह्या योग्य पण नाई.पण बापानं आपल्या दासांना म्हणलं,लवकर जाऊन चांगले कपडे काढून याले घाला.अन् त्याच्या हातात आंगठी अन् पायांत जोडे घाला.अन् पोसलेलं वासरू आणा अन् कापा ते आपुन खाऊ हर्ष आनंद करू.कावून कि हा माह्यांवाला पोरगा मेलेला होता,अन् तो आता जिवंत झाला हाय,हारोपला होता,आता सापडला हाय तवा ते सरेझण हर्ष आनंद करू लागले.
त्या वाकती त्याच्या मोठा पोरगा वावरांत होता,अन् जवा तो घराच्या जवळ पोचला,तवा त्यानं गाणं गायाच्या अन् नाच्याचा आवाज आयकलां.तवा त्यानं नौकरांय पैकी एकालें बलावून पुसलं,हे काय हून रायलं हाय.तवा त्यानं त्यालें म्हतलं,तुह्यावाला भाऊ आला हाय,अन् तुह्या बापानं पोसलेलं वासरू कापलं ह्या साठी तो सुखरूप भेटला म्हणून.हे आयकून त्याले रांग आला,अन् तवा अंदर गेला नाई,तवा त्याच्या बाप बायर येऊन समजाऊ लागला.पण त्यानं त्याच्या बापाले उत्तर देऊन म्हणलं,पाह्य म्या कईक वर्षापासून तुह्यावाली सेवा करून रायलो हाय,अन् कधीपण तुह्यी आज्ञा तोडली नाई,तरीपण त्या माह्यासाठी कधीपण एक बकरीचं पिलू पण देलं नाई,कि म्या माह्याल्या दोस्तामित्राय संग हर्ष आनंद करू.अन् जो पोरगा ज्यानं तुह्याली संपत्ती वेश्याईत गमाऊन ठाकली,अन् तो आल्यावर त्याच्या साठी पोसलेलं वासरू कापलं.तवा त्यानं त्यालें म्हणलं,बाळा[पोरां]तू त.. नेहमी माह्यावाल्या संग हायसं,अन् जे काई मालं हे तुह्यालंच हाय.पण आता हर्ष आनंद कर्ण योग्य हाय,कावून कि हा तुह्या भाऊ मेलेला होता,अन् तो परत जिवंत झाला हाय,हारोपलेला होता सापडला हाय.